# (कोकण विदर्भ बँक घरफोडी)

कुडाळ पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर १८८/२०१८ भा. दं. वि. कलम ४५४, ४५७, ३८०

---

दि. १३.०७.२०१८ रोजी १८-३० ते दि. १५.०७.२०१८ रोजी ०८-५५ वा चे मुदतित कोणीतरी अज्ञात चोरटयाने मुंबई गोवा महामार्गावरील मौजे पावशी येथील विदर्भ कोकण ग्रामीण बँकचे मॅनेजर केबिनचे बाजुच्या खिडकीचे गज वाकवुन व काढून त्यावाटे आंत प्रवेश करुन गॅस कटरच्या सहायाने आंतील तिजोरी फोडून आंतील रोख रक्कम व सोन्याचे दागिने मिळून १६, ४२, ३१२/- रुपये किंमतिचा माल चोरुन नेला म्हणुन वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

गुन्हा दाखल होताच गुन्हयाचे ठिकाणी आम्ही, दुय्यम अधिकारी व स्टाफसह भेट देवुन गुन्हयाचे घटनास्थळाची बारकाईने पाहणी केलेली आहे. गुन्हयाचे घटनास्थळी फिंगर प्रिन्ट एक्सपर्ट यांना बोलावुन घेवुन गुन्हयाचे घटनास्थळाचे चान्स प्रिन्ट हस्तगत करण्यात आलेले आहेत.

गुन्हयाचे घटनास्थळी डॉग स्कॉड बोलावुन घेवुन अज्ञात चोरटयाचा मागोवा घेतला परंतु विशेष काही माहीती मिळून आली नाही.

गुन्हयाचे घटनास्थळी अज्ञात आरोपीत यांनी गुन्हा करण्यासाठी गॅस कटरचा वापर केलेला होता. आरोपीत यांनी गुन्हा करण्यासाठी वापलेले गॅस सिलेंडर व इतर साहीत्य घटनास्थळी मिळून आलेले होते. घटनास्थळी मिळून आलेल्या गॅस सिलेंडरच्या पिशवीवर लिंगेश्वर मोटर गॅरेज ओरोस असे पिशवीवर पेनने लिहीलेले होते. त्याअनुषंगाने माहीती घेता आरोस खैरेवाडी येथील प्रवीण धोंडी हडपी याचे मोटर गॅरेज असुन त्याचे गॅरेज मधील गॅस कटर, गॅस सिलेंडर व ऑक्सिजन सिलेंडर असे साहीत्या दि. १३.०७.२०१८ रोजी १८-४५ ते दि. १४.०७.२०१८ रोजी ०९-३० वाजण्याचे दरम्याने चोरीस गेल्या बाबती फिर्याद सिंधुदुर्गनगरी पोलीस ठाण्यात दिल्याचे सांगितले. यावरुन आरोपीत यांनी ओरोस येथुन गॅस कटर व साहीत्य चोरुन नेवुन त्याचा वापर कुडाळ येथील बँके मधील चोरी करण्यासाठी वापरल्याचे निष्पन्न झाले.

गॅस कटरच्या सहाय्याने बँकेत चोरी करणारे आरोपीत यांचे बाबत महाराष्ट्र राज्य व आजुबाजुच्या राज्यात माहीती घेता सोलापुर जिल्हयातील टेंबुर्णी, लातुर व कोल्हापुर जिल्हयातील हातकणंगले या ठिकाणी स्टेट बँक ऑफ इंडीया या बँकेत देखील अज्ञात आरोपीत यांनी आजुबाजुच्या मोटर गॅरेज मधुन गॅस कटर व साहीत्याची चोरी करुन सदर गॅस कटरच्या सहायाने बँकेत चोरी करण्याचा प्रयत्न केला असुन घटनास्थळी गॅस कटर व साहीत्य टाकुन दिल्याचे समजले. म्हणुन सदर गुन्हयाचे तपासिक अधिकारी यांचेकडून गुन्हयाबाबत सविस्तर माहीती घेता आरोपीत यांची गुन्हा करण्याची मोडस ही एकच असल्याचे समजुन आले. यावरुन वरील तिन्ही ठिकाणी गुन्हा केलेल्या आरोपीत यांनीच वरील गुन्हा केल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येत आहे.

कुडाळ येथील गुन्हयाचे ठिकाणचा डमडाटा व ओरोस खैरेवाडी येथील घटनास्थळाचे ठिकाणचा डमडाटा काढण्यात आलेला असुन त्याचे ॲनॅलॅसिस करण्याचे काम चालु आहे. तसेच टेंबुर्णी व हातकणंगले येथील गुन्हयाचे घटनास्थळाचे डमडाटा संबंधितांकडून प्राप्त करुन घेण्यात आलेले आहेत.

आरोपीत हे दि.१३.०७.२०१८ रोजी गुन्हा करण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्हयात येवुन त्यांनी प्रथम ओरोस येथे मोटर गॅरेज मधील गॅस कटर व साहीत्य चोरुन दि. १३.०७.२०१८ ते दि. १५.०७.२०१८ या मुदतित कुडाळ येथील विदर्भ कोकण ग्रामीण बँकेत चोरी केलेली होती. सदरचा गुन्हयाता ४ ते ५ व्यक्तींचा सहभाग असावा असा कयास धरुन सिंधुदुर्ग जिल्हयातील तसेच गोवा राज्यातील मुंबई गोवा महामार्गावरील लॉजेस म्हापसा पर्यंत चेक करण्यात आले. तसेच आरोपीत यांनी गुन्हा करण्यासाठी वाहन देखील वापरल्याचे प्रथम दर्शन दिसुन येत असल्याने सिंधुदुर्ग जिल्हयातील पेट्रोल पंपातील सी सी टी व्ही फुटेजची पाहणी करण्यात आली.

सिंधुदुर्ग जिल्हयात तसेच राज्यातील इतर जिल्हयात यापुर्वी अशा प्रकारचे गुन्हे करणारे आरोपीत यांचे टोळीबाबत माहीती घेता १) सुरेश काशिराम उमक रा. मोरशी जि. अमरावती २) ज्ञानेश्वर उर्फ माऊली जगन्नाथ लोकरे रा. शिराळा टेंबुर्णी जि. सोलापुर ३) लक्ष्मण मधुकर कळसे रा. चौंडी ता. जामखेड जि. अहमदनगर, ४) मल्हारी मधुकर केदार रा. वरणी जि. बीड यांची टोळी असुन ते अशा प्रकारचे गुन्हे करत असल्याची माहीती मिळून आली. सुरेश काशिराम उमक रा. मोरशी जि. अमरावती याने आपले टोळीच्या सहायाने सन २०१२ मध्ये कणकवली ओसरगांव येथील विदर्भ वैनगंगा कृष्णा ग्रामीण बँकेत गॅस कटरच्या सहाय्याने चोरी केलेली होती. तसेच त्याने रत्नागिरी येथे देखील अशा प्रकारच्या चोऱ्या केलेल्या होत्या. सुरेश काशिराम उमक रा. मोरशी जि. अमरावती याचेबाबत माहीती घेता तो विशाखापट्ण, राज्य आंध्रप्रदेश येथुन दोन महीन्यापुर्वी जेलमधुन सुटल्याची माहीती मिळाली.

टेंबुर्णी येथील गुन्हयात आरोपीत यांचे सी सी टी व्ही फुटेज मिळून आलेले असुन ते प्राप्त करुन घेण्यात आलेले असुन सी सी टी व्ही फुटेज मधील आरोपीत यांचे नांव गांवाबाबत माहीती घेत आहोत.

अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या आरोपीत यांचे टोळीची माहीती घेण्यात आलेली असुन ती यासोबत आहे.

# सुरेश काशिराम उमक

| | | |
|---|---|---|
| सुरेश काशिराम उमक रा-कमलापुर ता-मोरशी जि-अमरावती | बारामती तालुका पो. ठा. ७०/१३<br>बारामती तालुका पो. ठा. ४८१/१३<br>शिरूर पो. ठा. २२०/१३<br>इंदापुर पो. ठा. ९७/१३<br>सोलापुर तालुका १४२/१२<br>रत्नागिरी ग्रा. ७१/११<br>खुलताबाद ४७/१३<br>गोराई ४७/१३<br>किलारी १७/१६ |  |
| प्रमोद अंबादास उमक रा-कमलापुर ता-मोरशी जि-अमरावती | |  |
| विशाल बाळु शिरसागर रा-निमगाव डाकु ता-कर्जत, जि-अहमदनगर | |  |
| किशोर भाउराव सुरडकर रा-शिलोड,सिंहनगर जि-औरंगाबाद. | |  |
| गजानन सुखदेव राठोड रा. अमरावती. | |  |
| दिलीप उत्तम नडे रा.यवतमाळ | |  |

## ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली जगन्नाथ लोकरे

| अक्र | नाव व पत्ता | पोलीस ठाणे | राहते ठिकाणाचा पत्ता |
|---|---|---|---|
| १ | ज्ञानदेव उर्फ जगन्नाथ लोकरे रा-शिराळा टेंबुर्णी ता-माढा जि-सोलापुर | कालाम पो. ठा. १५२/११<br>सांगोला पो. ठा. ३१०/१४<br>अक्कलकोट पो. ठा. १८४/१४ |  |
| २ | पृथ्वीराज उर्फ पतंग दत्ताराम माने रा-कणेर ता-माडा जि-सोलापुर. | |  |
| ३ | अमोल शत्रुघ्न माने रा-कणेर ता-माडा जि-सोलापुर | |  |

मल्हारी मधुकर केदार रा. वरणी जि.बीड

| | | |
|---|---|---|
| मल्हारी भिमराव केदार. रा-वरणी, ता-शिरुर.जि-बीड | हडपसर पो. ठा. १९५/१३<br>शिरुर पो. ठा. १०३/१३<br>भुईंज पो. ठा. ८३/१५<br>शिरुर पो. ठा. ८५/१५ |  |
| आजीनाथ उ र्फ बंडु गहीनीनाथ बडे रा-लोणीशिवार ता- शिरुर जि-बीड. | |  |
| बाळासाहेब उर्फ बाळु एकनाथ काळे रा-वाराणीता शिरुर ,ता-शिरुर. | |  |